ePaper
| वर्ष - 6 । अंक - 158 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । शनिवार । दिनांक 17 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## संजय राऊतांना जामीन नाहीच... इडीच्या वकिलांचा युक्तिवाद



**आतील पानांत**

- घेऊन पन्नास खोके महाराष्ट्रातील तरुणांना राज्य सरकारने दिले धोके"
- 'लेक वाचवा'चा दिला संदेश
- पालकमंत्र्यांना काय पर्याय असू शकतो?

# धरण परिसरात संततधार!

## धरण शंभर टक्के भरले : पवना धरणातून 10 हजार क्युसेकने विसर्ग

**। पिंपरी-चिंचवड ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पवना धरण परिसरात जोरदार पाऊस कोसळत असून धरणाच्या पाणीसाठ्यात सातत्याने मोठी वाढ होत आहे. धरण शंभर टक्के भरले असून धरणातून पाण्याचा विसर्गही सातत्याने वाढविण्यात येत आहे. शुक्रवार (दि.१६) सकाळी ८ वाजता पाण्याचा ३५०० क्युसेक विसर्ग करण्यात आला.**

मात्र, सातत्याने पाऊस वाढत असल्यामुळे दुपारी एकपासून ६४०० क्युसेस व पावर आऊटलेट १४०० असे एकूण ७८०० क्युसेक वाढविण्यात आला होता. त्यानंतर आता दुपारी ३ वाजता धरणाच्या सांडव्यातून ६४०० क्युसेक वाढवून ८६०० क्युसेक आणि पॉवर आऊटलेटमधून १४०० असे एकूण १० हजार क्युसेक करण्यात आले आहे. त्यामुळे पवना नदी काठच्या गावातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

पिंपरी-चिंचवड सह मावळवासीयांना पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. जुलै महिन्याच्या मध्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे यंदाही धरण ऑगस्ट महिन्यातच धरण शंभर टक्के भरले आहे. त्यानंतरही धरण परिसरात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे धरणातील पाण्याचा साठा वाढला आहे. अनेकवेळा पाण्याचा विसर्ग करावा लागला. मागील काही दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. त्यानंतर गेल्या आठ दिवसांपासून पवना धरण परिसरात पावसाने हजेरी लावली. धरणात सध्या १०० टक्के पाणीसाठा आहे.



### पावसाचा जोर पाहून पाण्याचा विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार

धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे दुपारी ३ पासून ६४०० क्युसेक वाढवुन ८६०० क्युसेस व पावर आऊटलेटसाठी १४०० असे एकूण १० हजार क्युसेक वाढविण्यात आले आहे. त्यामुळे पवना नदी किनाऱ्यावरील गावातील नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे. तसेच पावसाचा जोर पाहून पाण्याचा विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार असल्याचेही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# भाजपातर्फे 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' उपक्रमाचे आयोजन!

## 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 'सेवा पंधरवडा' : विविध सेवाकार्याने पंतप्रधानांचा वाढदिवस होणार साजरा

**। पिंपरी-चिंचवड ।**

**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस दि.१७ सप्टेंबरपासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत २ ऑक्टोबर या काळात 'सेवा पंधरवडा' म्हणून साजरा केला जाणार आहे. या अंतर्गत विविध सेवाकार्य करून पंतप्रधानांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. याबाबत राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष आणि मंडलाध्यक्षांना सूचना करण्यात आल्या आहेत.



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या सूचनेनुसार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात 'सेवा पंधरवडा' आयोजित केला असून, या कार्यक्रमांमध्ये स्थानिक खासदार, आमदार व अन्य लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग असणार आहे.

जिल्हा व मंडल स्तरावर पंतप्रधानांच्या जीवनावर प्रदर्शनी आयोजित करणार येणार आहे. प्रदर्शनी 'नमो ॲप'वर डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत. पंतप्रधानांच्या जनकल्याणकारी योजना व प्रशासकीय कार्यकौशल्याविषयी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांचा प्रचार-प्रसार करणार येणार आहे.

### युवा मोर्चाकडून जिल्हास्थानी रक्तदान शिबिर...

युवा मोर्चा पदाधिकाऱ्यांकडून जिल्हास्तरावर आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव आणि उपकरणे यांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच, क्षयरोगाने ग्रासलेल्या व्यक्तीला प्रत्येक मंडल अथवा वॉर्डस्तरावर एक वर्षासाठी दत्तक घेऊन त्यांच्या भोजन, पोषण आणि रोजगाराच्या संदर्भात सेवा कार्य करण्यात येणार आहे. बूथमध्ये वृक्षारोपणाच्या कार्यक्रमांचे लक्ष, सर्व मंडलांमध्ये दोन दिवसांचा स्वच्छता अभियान कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे.प्रत्येक जिल्ह्यात 'कॅच द रेन' अभियानासंबंधी जागरुकता. प्रत्येक मंडलात घरोघरी जाऊन जल संरक्षणाचे उपाय संवादाच्या स्वरुपात सांगणार आहेत.

### स्वच्छता अभियान जनजागृती..

तसेच, 'व्होकल फॉर लोकल'च्या माध्यमातून स्थानिक उत्पादने खरेदी, जिल्ह्यात बुद्धीजीवी संमेलन ,पंतप्रधानांचे व्यक्तिमत्व, व्हिजन, धोरणे आणि यश यांच्याविषयी व्यापक चर्चासत्र, बूथ स्तरावर प्रेरणास्त्रोत पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती २५ सप्टेंबर रोजी साजरी होणार आहे. यात त्यांच्या जीवनाविषयी चर्चासत्र व रचनात्मक कार्यक्रम, राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त २ ऑक्टोबर रोजी बापूंचे विचार, स्वदेशी, खादी, स्वावलंबन, साधेपणा आणि स्वच्छता याविषयी जागृतीसाठी अभियान राबविण्यात येणार आहे.

# घेऊन 50 खोके महाराष्ट्रातील तरुणांना राज्य सरकारने दिले धोके!

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष इम्रान शेख यांच्यातर्फे निषेध आंदोलन

**"शिंदे-फडणवीस खातात महाराष्ट्राची भाकरी पण करतात गुजरातची चाकरी"**

**"गुजरातला उद्योगाचा पेटारा, महाराष्ट्राला बेरोजगारीचा कटोरा"**

**"शिंदे फडणवीस गुजरातचे चाकर म्हणून चोरली मराठी तरुणांची भाकर"**

**"गुजरात तूपाशी महाराष्ट्र उपाशी"**

**"द्या आमच्या रोजगाराची हमी, बंद करा गुजरातची गुलामी"**



**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

सुमारे दीड लाख तरुणांना रोजगार देणारा वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प तळेगाव येथून गुजरातला गेल्यामुळे संबंध महाराष्ट्रातील युवकांमध्ये तीव्र रोष पाहायला मिळतोय. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहरअध्यक्ष इम्रान भाई शेख यांच्या नेतृत्वाखाली स्पाइनसिटी मॉल भोसरी येथे केंद्र व महाराष्ट्र सरकार यांच्या विरोधात निषेध आंदोलन केले गेले. यावेळी बोलताना युवक अध्यक्ष इम्रान भाई शेख म्हणाले "प्रत्येक वर्षी दोन कोटी नोकऱ्या युवकांना देऊ असं म्हणून सरकारमध्ये बसणारी भाजपा व त्याचे नेते यांनी नोकऱ्या तर दिल्या नाहीत परंतु आहेत त्या नोकऱ्या सुद्धा महाराष्ट्रातील तसेच पिंपरी चिंचवड मधील युवकाकडून हिरावून घेत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचं भाकरी खातात परंतु गुजरातची चाकरी करतात असा आरोप त्यांनी या वेळेस केला. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पिंपरी चिंचवड मधील अनेक उद्योग धंदे गुजरात मध्ये हलवले, तसेच तीन दिवसाचे मुख्यमंत्री झाले होते तेव्हा महाराष्ट्राचे 40 हजार कोटी केंद्र सरकारला परत पाठवले, आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्र, एन एस जी,मरीन पोलीस अकॅडमी, केंद्रीय यंत्रणाचे कार्यालय, आंतरराष्ट्रीय हिरे मार्केट, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे मुंबईचे मुख्यालय अजून अनेक उद्योगधंदे व महत्त्वाचे कार्यालय देवेंद्र फडणवीस व भाजप यांच्या महाराष्ट्र विरोधी धोरणामुळे गुजरातला गेल्याचे आरोप यावेळेस युवक अध्यक्ष इम्रान शेख यांनी केले. यावेळी बोलताना शहराध्यक्ष अजित भाऊ गव्हाणे म्हणाले, यशवंतराव चव्हाण साहेब,आदरणीय शरद पवार साहेब यानंतर विरोधी पक्ष नेते अजित दादा पवार यांच्या दूरदृष्टी मुळे हे पिंपरी चिंचवड शहर उद्योग नगरी म्हणून उदयास आले. पूर्ण भारतातून लोक पिंपरी चिंचवड, पुणे जिल्ह्यात रोजगाराच्या शोधात येत असतात.आयटी,मोठ मोठे उद्योग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या शहराला या देशातील नागरिकांना उपलब्ध करून दिले कधीही कोणाशी भेदभाव केला नाही. परंतु हे शिंदे फडणवीस सरकार महाराष्ट्राच्या दीड लाख युवकाचा रोजगाराच्या संधी गुजरातच्या घशात घालण्याचे जे काम करत आहे यावरून स्पष्ट होत आहे की हे गुजरात धार्जिणा असून महाराष्ट्राच्या युवकांशी यांचं काहीही घेणे देणे नाही. म्हणून वेदांत सारखा प्रकल्प व्यवसायासाठी पूरक असा वातावरण गुजरातपेक्षा महाराष्ट्रात चांगलं असून देखील महाराष्ट्रात आला असताना देखील गुजरातला पळवण्याचा पाप या शिंदे फडणवीस सरकारने केले आहे. मोदी सरकार जेव्हापासून केंद्रात आली आहे तेव्हापासून महाराष्ट्र सोबत भेदभाव करत आहे. महाराष्ट्रातील मोठमोठे उद्योग व्यापार कामधंदे गुजरातला घेऊन जाण्याचा प्रकार मागच्या आठ वर्षात सातत्याने होत असल्याचं यावेळेस शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी सांगितलं.

### युवकांचा आंदोलनात सहभाग

यावेळी महिला अध्यक्ष कविता आल्हाट,नगरसेवक पंकज भालेकर, संजय वाबळे, माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी,मायाताई बारणे,मारुती भापकर,संगीता ताम्हणे,ओबीसी सेलचे अध्यक्ष विजय लोखंडे,काशीनाथ नखाते, काशिनाथ जगताप,ज्योती गोफणे,कविता खराडे,सचिन औटी,अकबर मुल्ला,उज्वला ढोरे,संगीता कोकने,ज्योती तापकीर,युवराज पवार,लाल मोहम्मद चौधरी,युवक कार्याध्यक्ष निलेश निकाळजे,प्रवीण खरात, पिंपरी विधानसभा अध्यक्ष आयूष निंबारकर, युवक उपाध्यक्ष रोहित वाबळे, अमोल रावळकर, तुषार ताम्हणे, लवकुश यादव,मंगेश बजबळकर, शारुख शेख, सरचिटणीस दीपक गुप्ता, संकेत जगताप, सागर वाघमारे,मयूर थोरवे,अनुज देशमुख,रोहित खोत शहरसचिव ओम शिरसागर,सतेज परब,कुणाल जगताप,साहिल शिंदे, मयूर खरात,प्रशांत भोसले,निखिल गाडगे, गफूर शाह,इखलास भाई सैय्यद,रोहित मोरे,अनिल चव्हाण आणि मेधा पळशीकर,निर्मला माने,तृतीयपंथी अध्यक्ष किरण वाघ, मोठ्या संख्येत युवक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाषाण-सूस उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला, वाहतूक कोंडी टळण्याची शक्यता

## चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला विश्वास



**। पुणे। महाईन्यूज ।**

पाषाण, सूस, म्हाळुंगे, नांदे, चांदे या भागातील नागरीकांना तसेच पुणे शहरातून यामार्गे मुळशी, कोकण आणि हिंजवडी परिसरात होणारी वाहतूक कोंडी पाषाण-सूस उड्डाणपुलामुळे कमी होण्याची शक्यता आहे. पाषाण-सूस उड्डाणपूल शुक्रवारपासून (१६ सप्टेंबर) वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. दरम्यान, हिंजवडी माहिती आणि तंत्रज्ञान पार्कच्या बाजूला होणारी वाहतूक कोंडीची समस्याही या उड्डाणपुलामुळे काही अंशी सुटेल, असा विश्वास राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारवर महानगरपालिकेतर्फे पाषाण-सूसला जोडणाऱ्या उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार भीमराव तापकीर, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, रवींद्र बिनवडे, विलास कानडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने, माजी सभागृहनेते गणेश बीडकर, माजी नगरसेवक बाबुराव चांदेरे आणि अमोल बालवडकर यावेळी उपस्थित होते. या उड्डाणपुलाला राजमाता जिजाऊ भोसले यांचे नाव देण्यात येईल आणि राजमाता जिजाऊंचा पुतळाही या ठिकाणी उभा केला जाईल, अशी घोषणाही पाटील यांनी केली.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, चांदणी चौकातील सहापदरी पूल झाल्यावर या भागातील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार आहे. परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आणि त्यासाठी वाहतूक वळवण्यासाठी काही बाबतीत हा पूल उपयुक्त होईल. शहराची गतीने वाढ होत आहे. उद्योग, व्यापार, शैक्षणिक क्षेत्र आदींमध्ये शहर पुढे राहण्यासाठी रस्ते, उडाणपूल, मेट्रो, पूल आदी पायाभूत सुविधांची निर्मिती गरजेची आहे. पाषाण- सूस भागातील घनकचरा प्रकल्प हलवण्याची नागरिकांची मागणी त्यानुार भूसंपादन करून प्रकल्प स्थलांतरीत करण्यात येईल. सन १९९५ नंतर उड्डाणपूल, तसेच रस्त्यांच्या बाबतीत राज्यात चांगली पाऊले टाकली गेली आहेत. शहरात मोठ्या पावसामुळे सिग्नल व्यवस्था बंद पडू नये यावर उपाययोजना करणे आणि अशावेळी ऐनवेळचे वाहतूक नियोजन करणे गरजेचे आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था, घनकचरा, सांडपाण्याचे व्यवस्थापन गरजेचे आहे, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

# बाल गिर्यारोहक गिरीजा लांडगे हिची अजस्त्र काला नाग पर्वतावर चढाई!

## ‘लेक वाचवा’चा संदेश : पुणे जिल्ह्यातील आठ गिर्यारोहकांचा समावेश

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

गिर्यारोहकांच्या चढाईसाठी नावाप्रमाणेच अजस्त्र उत्तराखंडमधील काला नाग ( ब्लॅक पीक ) पर्वतावर चढाई करण्याचा पराक्रम पुणे जिल्ह्यातील गिर्यारोहकांनी केला. यामध्ये भोसरीतील बाल गिर्यारोहक गिरीजा लांडगे हिचा समावेश आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील गिर्यारोहकांनी उत्तराखंड येथील ६३८७ मी उंचीच्या शिखरावर ६०१० मीटर पर्यंत यशस्वी चढाई केली. बंदरपूंछ पर्वतरांगेतील अतिदूर्गम व अजस्त्र असा ब्लॅक पीक (काला नाग) पर्वत आणि त्यावर असणाऱ्या हिमभेगा, चढाईसाठी ७५-८० अंश कोनात असणारा तीव्र चढ आणि उणे १५-२० अंश सेल्सियस असणारे तापमान यामुळे चढाईसाठी अतिकठीण मानला जातो.

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पुणे जिल्ह्यातील गिर्यारोहकांचा पुढाकार !

या शिखरावर चढाईची मोहीम दि.२६ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या दरम्यान आखली होती. यामध्ये एकूण ८ गिर्यारोहकांचा सहभाग होता. वय वर्षे १३ पासून ते वय वर्षे ५१ पर्यंतचे गिर्यारोहक या मोहिमेत सहभागी झाले . यामध्ये कु. गिरीजा धनंजय लांडगे (१३ वर्षे ), धनंजय सयाजी लांडगे, गोपाल भिमय्या भंडारी, ओंकार सुभाष पडवळ, शालिनी शर्मा, निखिल किसन कोकाटे, सुनिल पिसाळ (५१ वर्षे ), विश्वजीत पिसाळ ( ५० वर्षे ) यांनी सहभाग घेतला. एकूण १५ दिवसांची मोहीम होती. गिर्यारोहक धनंजय लांडगे म्हणाले की, सुरुवातीचे २ दिवस पुणे ते देहरादून रेल्वे प्रवास करून आमची टीम देहरादून येथे पोहोचली, ही मोहीम सेमी अल्पाईन पद्धतीची असल्याने सोबत असलेले तांत्रिक साहित्य वगळता मोहीमेसाठी लागणारे सर्व किराणा , भाजीपाला साहित्य बाजारातून गोळा करून लोकल गाईडच्या साह्य्याने टिमने पुढील प्रवासाला सुरूवात केली.



सांक्री ते तालूका या गावांदरम्यानचा गाडीप्रवास चालू असताना तीन ठिकाणी भूस्खलन सारख्या नैसर्गिक संकटावर मात करत पुढे जावे लागले. सेमी अल्पाईन पद्धत असल्याने मोहीमेसाठी लागणारे साहित्य जवळजवळ प्रत्येकी २५ किलो वजन घेऊन तालूका - गंगाड - सीमा - रुईनसारा लेक - क्यारकोटी बेस कँप - ॲडव्हान्स कँप पर्यंत रोज सरासरी ९-१० किमी पायी ट्रेक करत व रोज ५००-७०० मीटर पर्यंत उंची गाठत सर्वजण कँप पर्यंत पोहोचले. दरम्यान, जाताना टीमला भूस्खलनसारख्या नैसर्गिक अडचणीला सामोरे जावे लागले . बेस कँप पर्यंत पोहोचण्यासाठी आलेल्या अनेक अडचणींवर मात करत , अगदी टिमने बेस कँप ते समिट कँप पर्यंत भूस्खलन (LAND SLIDE) ने पूर्णपणे बंद झालेल्या रस्त्यांवर स्वतः रस्ता तयार करत , नैसर्गिक अडचणींवर मात करत सम्मीट कँप गाठला. अनेक नैसर्गिक अडचणींवर मात करीत मोहीम यशस्वी करण्याची जिद्द आम्ही ठेवली आणि यशस्वी झालो.




### “लेक वाचवा , लेक जगवा , लेक वाढवा”चा संदेश...

महाराष्ट्रातील पहिली टीम कि ज्या टिमने कालानाग ( ब्लॅक पीक) पर्वतावर ६०१०मी. पर्यंत यशस्वी चढाई करून तिरंगा ध्वज फडकावत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. तसेच, “लेक वाचवा , लेक जगवा , लेक वाढवा”चा संदेश देण्यात आला. या मोहीमेत रोज सकाळ संध्याकाळ गणरायाची आरती करून गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या गिर्यारोहण मोहीमेस दूर्गप्रेमी गिरीभ्रमण संस्था , सह्याद्री रोव्हर्स , ध्यास सह्याद्री , शिवदुर्ग मित्र लोणावळा ,महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन, ॲडव्हेंचर डायरीज , ॲडव्हेंचर मंत्रा , माऊंटेन स्पोर्टस ॲकॅडमी या संस्थांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या संस्थांच्या सहकार्याने पहिल्यांदाच अशी मोहीम संयुक्तिक पणे राबवण्यात आली, अशी माहिती गिर्यारोहक धनंजय लांडगे यांनी दिली.









## संपादकीय »

# भारत जोडो आणि पडझड

***महाराष्ट्राचा चहूबाजूंनी जो ऱ्हास सातत्याने चालू आहे; त्यातील नवा अध्याय म्हणून वेदान्त-फॉक्सकॉनच्या गुजरात गमनाकडे पाहावे लागेल. वेदान्त या भारतीय कंपनीने परदेशी कंपनीच्या सहकार्याने भारतात सेमी-कंडक्टर म्हणजे विद्युत प्रवाहाचे अर्धवाहक बनविण्याचा प्रस्ताव सात वर्षे जुना आहे***

भारतीय जनता पक्षाने काँग्रेस पक्ष जमेल तितका दुर्बळ करण्याचा पण केलेला दिसतो. राहुल गांधी यांनी कन्याकुमारी येथून 'भारत जोडो' यात्रा सुरू केली आहे. ती दीडशे दिवस चालणार असून १२ राज्ये तसेच दोन केंद्रशासित प्रदेशांमधून जाणार आहे. ही साडेतीन हजार किलोमीटर अंतराची यात्रा निवडणूक होऊ घातलेल्या गुजरातमध्ये जाणार नाही किंवा केंद्रीय सत्तेचे गणित ठरविणाऱ्या उत्तर प्रदेशात कमी काळ राहणार, याबद्दल पक्षात नाराजी आहे. दुसरीकडे, राहुल यांनी केरळला खूप जास्त दिवस दिल्याने तिथला सत्ताधारी मार्क्सवादी पक्ष नाराज आहे. हे चालू असताना गोव्यातील ११ काँग्रेस आमदारांपैकी आठ भाजपमध्ये गेले आहेत. तेथे दुसऱ्यांदा भाजप सरकार आल्यापासूनच काँग्रेस फुटणार असल्याची चर्चा होती. अखेर, काँग्रेसमधली पाच वर्षांतील तिसरी फूट पडली. गोव्यात पक्षांतर हे वेषांतराइतकेच सहज व नैसर्गिक असते. फक्त आता पक्षांतरबंदी कायद्यामुळे आवश्यक तितके आमदार गोळा करावे लागतात. राहुल गांधी यांच्या यात्रेवर लक्ष केंद्रित केलेल्या काँग्रेस नेत्यांना या घडामोडी समजत नव्हत्या का आणि त्या रोखण्यासाठी त्यांनी काय केले; या प्रश्नांना तर काही अर्थच राहिलेला नाही. कारण हाच प्रश्न ज्योतिरादित्य शिंदे यांच्यापासून गुलाम नबी आझाद यांच्यापर्यंत सर्वांबाबत विचारता येईल.

राहुल यांची 'भारत जोडो' यात्रा सुरू झाली तेव्हा चंद्रशेखर यांच्यापासून कुणी कुणी पदयात्रा काढल्या आणि त्यातून राजकारणाला कसे वेगळे वळण लागले, याचे दाखले दिले गेले. ते उत्साह वाढविणारे असले तरी मुळात जो पक्ष शिल्लक आहे, राज्याराज्यात जे लोकप्रतिनिधी आहेत, त्यांना टिकवून धरण्यात अपयश का येते आहे, याचा मुळातून विचार करण्यास काँग्रेसनेते तयार नाहीत. त्यामुळे, जयराम रमेश यांनी केवळ सत्ताधाऱ्यांवर तोंडसुख घेऊन काय होणार? 'इकडे तुम्ही यात्रा काढताय आणि तिकडे तुमचे आमदार निघून जात आहेत,' असे कुणी म्हटले तर त्याला काय उत्तर देणार? विशेष म्हणजे, गोव्यात विधानसभा निवडणूक झाली तेव्हा काँग्रेसच्या सर्व उमेदवारांनी राहुल गांधी यांच्या उपस्थितीत 'मी आमदार म्हणून निवडून आलो तर पाच वर्षे काँग्रेसचे काम करीन. कोणत्याही स्थितीत पक्ष सोडणार नाही,' अशी शपथ घेतली होती. उमेदवार मंदिरे आणि चर्चमध्ये जाऊनही हे म्हणत होते.



## आनंदी सकाळ

### 'अहंतागुणे सर्वही दुःख होते

संतांचे कार्य हे दिसत नाही आणि आपले सगळे कार्य देखाव्याचे असते. कारण, आपल्यात अहंकार ठासून भरला आहे. मन, बुद्धी, चित्त, अहंकार मिळून अंतःकरण चतुष्टय आहे. म्हणजे ते वेगवेगळे नाहीत. अणुमध्ये इलेक्ट्रॉन, प्रोटॉन आणि न्यूट्रॉन आहेत. त्यांना आपण वेगळे करू शकतो. पण मन, बुद्धी, चित्त, अहंकार एकमेकांना इतके चिकटून आहेत की, ते वेगळे करणे अशक्य आहे. त्यातही अहंकार जास्त प्रभावी आहे. अहंकाराचे वैशिष्ट्य म्हणजे तो सगळ्यामध्ये शिरतो. कुठल्याही क्षेत्रात; मग ते धार्मिक असो, सामाजिक असो, सांस्कृतिक असो हा अहंकार असतोच. अहंकार काढण्यासाठी जगामध्ये औषधच नाही. औषध एकच. ते म्हणजे संतांच्या पायाजवळ बसणे. अहंकाराविषयी संतांनी असे म्हटले आहे की, 'अहंकार ज्या मानसीचा गळेना, तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना।' ज्याच्या डोक्यातील अहंकार निघत नाही, त्याला कितीही ज्ञान सांगितले तरी ते कळत नाही. 'अहंतागुणे सर्वही दुःख होते, मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते.'पण तो केव्हा मान वर काढेल हे सांगता येत नाही.

# पालकमंत्र्यांना काय पर्याय असू शकतो?



भूमिका



राज्यात सत्तापालट झाल्यावर मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लगेच जिल्ह्यातील नियोजन समित्यांच्या कामांना स्थगिती दिली. ती अद्याप उठविली गेलेली नाही. भाजप व शिंदे गटाच्या सरकारमध्ये मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसह सध्या १८ मंत्री असले तरी अद्याप पालकमंत्र्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत. जिल्ह्यातील विकासकामे जिल्हा नियोजन समितीमार्फत केली जातात आणि पालकमंत्री हे या समितीचे अध्यक्ष असतात. पण सध्या अध्यक्षच नसल्याने या समित्यांचे कामकाज व पर्यायाने जिल्ह्यातील विकासकामे ठप्प आहेत. राज्य सरकारने दिलेल्या सरसकट स्थगितीमागेही सबळ कारण आहे. राज्यात सत्तासंघर्ष सुरू होऊन महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आले, या कालावधीत पुणे व नाशिक जिल्हा नियोजन समित्यांच्या बैठकांमध्ये उपलब्ध निधीच्या अनेक पट खर्चाच्या कामांना मंजुरी देण्यात आली. पुणे जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष पालकमंत्री अजित पवार होते आणि तेथे ८७५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली होती. तर नाशिक जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष छगन भुजबळ होते, तेथे ५६७ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली होती. आपल्या मतदारसंघातील विकासकामांना किंवा महाविकास आघाडीतील नेत्यांच्या कामांसाठी निधीची तरतूद केली गेली किंवा विकासकामांना घाईघाईने मंजुरी दिली गेली, असा प्रामुख्याने आक्षेप घेण्यात आला होता. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारने सत्तेवर येताच १ एप्रिल २०२२ पासून मंजूर केलेल्या राज्यातील सर्वच जिल्हा नियोजन समित्यांच्या कामांना ४ जुलै रोजी सरसकट स्थगिती दिली. नवीन पालकमंत्र्यांची नियुक्ती झाल्यावर या कामांचा आढावा घेण्यात येईल. त्यानंतर कोणती विकासकामे मंजूर करायची, सुरू ठेवायची व किती निधी द्यायचा, आदींबाबत निर्णय घेतला जाणार आहे. पण अद्याप नवीन पालकमंत्री नियुक्त न झाल्याने आणि त्यांच्या अनुपस्थितीत हंगामी अध्यक्ष निवडून किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अध्यक्षपदाची तात्पुरती जबाबदारी देऊन जिल्हा नियोजन समित्यांचे कामकाज सुरू करणे राज्य सरकारला शक्य आहे. मात्र विकासकामे व त्यासाठीचा निधी हा राजकीय नेत्यांसाठी कळीचा मुद्दा व संवेदनशील विषय असल्याने राज्य सरकारने अजून पालकमंत्रीही नियुक्त केलेले नाहीत की तात्पुरते कामकाज सुरू करण्यासाठीही आदेश जारी केलेले नाहीत. जिल्हा राजकारणाच्या दृष्टिकोनातून अतिशय प्रभावी असलेल्या या समित्यांचे कामकाज महत्त्व काय, राजकारण बाजूला ठेवून विकासकामाचे नियोजन करता येईल का, पालकमंत्रीच अध्यक्षस्थानी का हवे, त्यांच्या अनुपस्थितीत निष्पक्ष व सक्षम पर्यायी व्यवस्था उभी करता येईल का, आदी महत्त्वाच्या मुद्द्यांचा विचारही यानिमित्ताने नव्याने करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. हिमालयीन नद्यांचा महासमुद्र बांगलादेशाला अनेकदा विळखा घालतो.

# ई कॉमर्स : विकासाच्या नव्या युगासाठी...

**एकीकडे २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याच्या दिशेने आपण प्रवास सुरू करत असताना, पुढील २५ वर्षांत भारताचे स्थान नेमके काय असेल, याचा धांडोळा घेतला तर 'इंडो-पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क' ही महत्त्वाची मानली जात आहे.**

अर्थात, वरकरणी ही फ्रेम अत्यंत चकचकीत आणि मोहक दिसत असली तरी त्यात अनेक खिळे असे आहेत ज्याची वेदना सहन करण्याची ऊर्जासुद्धा महत्त्वाची ठरणार आहे. भारतासह १४ देशांनी 'इंडो-पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क' स्वीकारले आहे. अलीकडेच झालेल्या या बैठकीत कराराचा पहिला आराखडा तयार झाला. ही रचना डिजिटल व्यापार आणि मानकांच्या सुसंवादावर भर देते. चार स्तंभांपैकी, समृद्धी, सहयोग आणि अमर्याद शक्यतांची अर्थव्यवस्था म्हणून पाहिल्या जाणाऱ्या 'कनेक्टेड इकॉनॉमी'च्या स्तंभाला व्यापार स्तंभ म्हणून व्यापकपणे पाहिले जाते. यांत डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ई-कॉमर्सचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. यात बाजारपेठ प्रवेश आणि करांच्या दरात कपात करण्याच्या दृष्टीने बंधनकारक नसले तरी, डिजिटल व्यापाराच्या



अवकाशातील गैर-शुल्क अडथळे कमी करण्यावर आणि सहकार्यावर याचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडू शकतो. मात्र, भारताची तीव्र संरक्षणवादी धोरणे या व्यासपीठाला लागू नाहीत. हिंद प्रशांत क्षेत्राच्या समृद्धीसाठी आर्थिक रचना याविषयी चर्चेचा ऊहापोह करण्यासाठी जपानमध्ये टोकियो येथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच सहभागी झाले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ बायडन आणि जपानचे पंतप्रधान किशिदा फुमिओ हेही यावेळी उपस्थित होते. तर ऑस्ट्रेलिया, ब्रुनेई, इंडोनेशिया, कोरियन प्रजासत्ताक, मलेशिया, न्यूझीलंड, फिलिपिन्स, सिंगापूर, थायलंड, आणि व्हिएतनाम हे अन्य भागीदार देशही यावेळी आभासी माध्यमातून सहभागी झाले होते. 'इंडो-पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क' अर्थात 'भारत प्रशांत क्षेत्र आर्थिक आराखडा' म्हणजे, नियमावर चालणारी आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था आणि पारदर्शक आर्थिक व्यवस्था राखणे हे समान उद्दिष्ट बाळगणाऱ्या समविचारी देशांसोबत मुक्त आणि निष्पक्ष व्यापारासाठीचा महत्त्वाचा टप्पा आहे. इंडो-पॅसिफिकमधील राजकीयदृष्ट्या स्थिर आणि खुल्या अर्थव्यवस्था, परस्परांमध्ये आर्थिक क्रियाकलापांचा, आर्थिक उलाढालींचा विस्तार करण्यासाठी यात सहभागी देश एकत्र येत आहेत.

अलीकडच्या काही काळात भारतात होत असलेल्या प्रगतिकारक सुधारणा आणि विकास कामांमुळे, देशाने जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये पाचवा क्रमांक पटकावला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



माझी पाठ करा कवी ।  
उट लावी दारोदार ।।१।।  
तंव तया पारखी सिव ।  
लाजे ठाव सांडितां ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# लंपीग्रस्त जनावरांसाठी विलगीकरण केंद्र – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**। सांगली । महाईन्यूज ।**

राज्यात आता आणखी एका नव्या आजाराने शिरकाव केल्याचे दिसून येत आहे. हा आजार जनावरांमध्ये आढळून येत असून, मोठ्या प्रमाणात वाढताना देखील दिसत आहे. 'लंपी स्किन डिसीज' असे या आजाराचे नाव असून त्वचेशी संबंधित असणाऱ्या या रोगामुळे गुजरात आणि राजस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात गुरांचा मृत्यू झालेला आहे. महाराष्ट्रातही या आजाराचा शिरकाव झाल्याने राज्य शासन सतर्क झाले असून, या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित झालेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (शुक्रवार)एक नवीन माहिती दिली आहे. राज्यात आता लंपीग्रस्त जनावरांसाठी विलगीकरण केंद्र निर्माण केले जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहेत.

औरंगाबादेत माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "लंपीच्या बाबतीत राज्य शासन अतिशय गंभीर आहे. आमचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि त्यांची टीम यावर काम करत आहे.

# महाराष्ट्र गुजरातच्या मागे पडलाय, आम्ही नंबर वन बनवू : फडणवीस

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचे दावे खोडून काढत महाराष्ट्र गुजरातच्या मागे पडल्याची व्यक्त केली खंत

**। मुंबई । महाईन्यूज ।**

वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प महाराष्ट्रातील पुण्याहून गुजरातला हलवण्यात आला आहे. त्यामुळे राज्याचं राजकारण तापलं आहे. विरोधकांकडून सत्ताधारी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकारवर हल्लाबोल करण्यात आला आहे. यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचे दावे खोडून काढत महाराष्ट्र गुजरातच्या मागे पडल्याची खंत व्यक्त केली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुजरातच्या अर्थव्यवस्थेत जामनगर रिफायनरी आणि मुद्रा पोर्टचा मोठा वाटा मोठा आहे. मात्र आपल्याकडे रिफायनरीलाच विरोध



करण्यात आला. मी अनिल अग्रवाल यांच्याशी बोललो होतो. गुजरातपेक्षा चांगलं पॅकेज करतो म्हटलं. त्यावर ते म्हणाले की, आम्ही महाराष्ट्रात नक्कीच गुंतवणूक करू, पण आता आमचा निर्णय़ झालेला आहे. दरम्यान अनिल अग्रवाल यांचा निर्णय़ आमचं सरकार येण्याच्या आधीच झाला होता. आम्ही आल्यानंतर आम्ही खूप प्रयत्न केला. मात्र ज्यांनी काहीच केलं नाही ते आमच्याकडे बोट दाखवत आहेत. तुमच कर्तृत्व काय आहे, हे सांगा, असा सावल करत, महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्र गुजरातच्या मागे गेला आहे. मात्र पुढील दोन वर्षात महाराष्ट्राला निश्चित पुढे नेणार, असंही फडणवीस म्हणाले.

सर्व जिल्ह्यांच्या अडचणी मी सोडणारच आहे. भारताला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था करायचं असेल तर महाराष्ट्र वन ट्रिलियन करावाच लागले. महाराष्ट्र वन ट्रिलियन झाल्याशिवाय भारत ५ ट्रिलियन होणार नाही. त्यासाठी एकत्रितपणे टीम म्हणून काम करावं लागेल. ते करण्याची पूर्ण मानसिकता आमची असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं.

# "मुख्यमंत्र्यांना गरागरा गरागरा..."

## दांडिया, गरबाचा उल्लेख करत CM शिंदेंना आदित्य ठाकरेंचा जाहीर भाषणात टोला

**।रत्नागिरी । महाईन्यूज ।**

आज रत्नागिरीच्या दौऱ्यावर असणारे शिवसेनेचे नेते आणि माजी पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर सभेत टोला लगावला आहे. 'वेदान्त-फॉक्सकॉन' प्रकल्पाचा संदर्भ देत आदित्य यांनी शिंदेंच्या दौऱ्यांवरुन खोचक शब्दांमध्ये रत्नागिरीमधील सभेत टीका केली. या प्रकल्पासंदर्भातील पाठपुरावा उद्योग खात्याने आणि मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर केला पाहिजे असं आदित्य ठाकरे म्हणाले. मात्र ही घाई करण्यामागे त्यांनी मुख्यमंत्र्यांना आता नवरात्रीमध्ये दांडीया आणि गरब्यासाठी जायचं असेल तर काम मागे राहून जाईल असा उपहासात्मक संदर्भ दिला. तसेच मुख्यमंत्री शिंदे नवरात्रीमध्ये मंडळ फिरण्याचा विक्रम करतील असा शाब्दिक चिमटाही आदित्य ठाकरेंनी काढला.



**उद्योगांबद्दल बोलताना आदित्य यांनी, "उद्योग खातं असेल किंवा मुख्यमंत्री असतील लवकर पाठपुरावा केला पाहिजे. कारण आता नवरात्री येणार आहे तर मुख्यमंत्री मोहोदयांना दांडिया, गरबा (फिरायचं असेल). सध्या त्यांचं रेकॉर्ड आहे. २५० मंडळं तरी फिरलेले असतील. आता ४५० मंडळं (फिरतील) स्वत:च्या नावाने वर्ल्डबूकमध्ये रेकॉर्ड करायचं आहे. गरागरा.. गरागरा फिरायचं आहे सगळीकडे," असा टोला अगदी हातवारे करुन लगावला. पुढे बोलताना आदित्य यांनी, "थोडं हे बाजूला ठेवलं पाहिजे," असंही म्हटलं. मुख्यमंत्री शिंदेंच्या आगामी 'हिंदू गर्व गर्जना' यात्रेवरही आदित्य ठाकरेंनी टीका केली. "**

राज्यातून बाहेर गेलेल्या उद्योगांबद्दल बोलताना आदित्य यांनी, "उद्योग खातं असेल किंवा मुख्यमंत्री असतील लवकर पाठपुरावा केला पाहिजे. कारण आता नवरात्री येणार आहे तर मुख्यमंत्री मोहोदयांना दांडिया, गरबा (फिरायचं असेल). सध्या त्यांचं रेकॉर्ड आहे. २५० मंडळं तरी फिरलेले असतील. आता ४५० मंडळं (फिरतील) स्वत:च्या नावाने वर्ल्डबूकमध्ये रेकॉर्ड करायचं आहे. गरागरा.. गरागरा फिरायचं आहे सगळीकडे," असा टोला अगदी हातवारे करुन लगावला. पुढे बोलताना आदित्य यांनी, "थोडं हे बाजूला ठेवलं पाहिजे," असंही म्हटलं. मुख्यमंत्री शिंदेंच्या आगामी 'हिंदू गर्व गर्जना' यात्रेवरही आदित्य ठाकरेंनी टीका केली. "काल परवा मी ऐकलं की मी यात्रा काढली शिवसंवाद म्हणून त्यांना पण आता यात्रा करायची आहे कुठली तरी गर्जना यात्रा. ठीक आहे यात्रा करा. यात्रांना माझा आक्षेप नाही. पण यात्रा काढण्याआधी तुम्ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उत्तर देणं गरजेचं आहे की तुम्ही अजून ओला दुष्काळ जाहीर का नाही केला?" असं आदित्य म्हणाले. त्याचप्रमाणे, "ज्या ज्या सवलती आम्ही महाविकास आघाडीकडून देत होतो, कर्जमुक्त करत होतो शेतकऱ्यांना ते तुम्ही अजून का नाही केलं, याचंही उत्तर शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी दिलं पाहिजे," असं आदित्य म्हणाले."ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये जात आहात तिथल्या तरुणांना तुम्ही उत्तर देणं अपेक्षित आहे की जो रोजगार आपण या महाराष्ट्रात आणणार होतो तो रोजगार तुम्ही का नाही आणू शकलात, हे उत्तर देणं गरजेचं आहे. डबल इंजिनमध्ये एक इंजिन फेल का झालं आहे? हे उत्तर देणं गरजेचं आहे," असंही आदित्य ठाकरे म्हणाले. कोकणातील शिंदे सरकारमधील महत्त्वाचे नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यावरही आदित्य यांनी टीका केली. "आज महाराष्ट्रातील हालत कशी आहे बघा.

# दसऱ्याला शिवाजी पार्क सुनेसुने राहणार ?

## सेना आणि शिंदे गटाला परवानगी नाकारण्याची शक्यता




**। मुंबई । महाईन्यूज ।**

दसरा मेळाव्यासाठी दादरचे शिवाजी पार्क मैदान मिळावे यासाठी शिवसेना आणि बंडखोर आमदारांच्या गटाकडून जोरदार मोर्चेबंधणी सुरू असून शिवसेना – शिंदे गटातील तणावाचे वातावरण, प्रभादेवीमध्ये उभय गटांमध्ये झालेला वाद या पार्श्वभूमीवर शिवाजी पार्क मैदानात दसरा मेळाव्याच्या आयोजनासाठी नेमकी कोणाला परवानगी द्यायची असा पेच मुंबई महानगरपालिकेसमोर निर्माण झाला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या जी-उत्तर विभाग कार्यालयाने याबाबत विधी खात्याकडून अभिप्राय मागविला आहे. मात्र एकूण परिस्थिती आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता यंदा शिवाजी पार्क मैदानात दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यासाठी कोणालाच परवानगी मिळणार नाही, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. परिणामी, यंदा दसऱ्याच्या दिवशी शिवाजी पार्क मैदान सुनेसुने राहण्याची चिन्हे आहेत.

गेली अनेक वर्षे शिवाजी पार्क मैदानावर शिवसेनेतर्फे दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. पूर्वी दसरा मेळाव्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या पश्चात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी ठिकठिकाणांहून मोठ्या संख्येने शिवसैनिक शिवाजी पार्क मैदानावर येत होते. काही महिन्यांपूर्वी शिवसनेचे आमदार एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली.

## शॉर्ट न्यूज »

### चीनमधील ४२ मजली इमारतीला भीषण आग



।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

चीनमधील चँगशा शहरातील एका उत्तुंग इमारतीला मोठी आग लागली आहे. चीनमधील सरकारी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार सध्या तरी या अपघातामधील मृतांची आकेडवारी समोर आलेली आहे. चँगशा शहर हे हुनान प्रांताच्या राजधानीचं शहर आहे. आग लागलेल्या इमारतीमध्ये प्रमुख सरकारी कंपनीचं कार्यालय असल्याची माहितीही समोर आली आहे.चीनमधील सरकारी वृत्तवाहिनी असणाऱ्या सीसीटीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, "आग लागलेल्या इमारतीच्या सर्व बाजूने धूर निघत आहे. अनेक मजल्यांवर ही आग पसरली आहे," असं स्थानिक प्रसारमाध्यमांनी म्हटलं आहे. आग विजवण्याचे प्रयत्न अग्निशमन दलाकडून सुरु आहेत असंही प्रसारमाध्यमांनी म्हटलं आहे. ही इमारत ४२ मजल्याची आहे.

# 'मद्य घोटाळा' नक्की काय आहे तेच समजत नाहीये!

## CBI, EDचा उल्लेख करत केजरीवाल मोदी सरकारवर बरसले

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शुक्रवारी आरोप केला की "केंद्रीय अन्वेषण ब्यूरो (CBI) आणि अंमलबजावणी संचालनालय (ED) अनावश्यकपणे प्रत्येकाला त्रास देत आहेत". तसेच, "मद्य घोटाळा नक्की काय आहे हे अद्यापही समजत नाहीये. देशाची अशी प्रगती होऊ शकत नाही." असेही केजरीवाल म्हणाले आहेत.**





आम आदमी पार्टी विरोधातील "स्टिंग ऑपरेशन" वर भाजपाला प्रत्युत्तर देताना केजरीवाल म्हणाले, "यामध्ये मद्य घोटाळ्यातील एक आरोपी असे म्हणताना ऐकू येते की, उत्पादन शुल्क धोरण अशा प्रकारे तयार केले गेले आहे की काही निवडक लोकांना फायदा झाला. तर, "हे स्त्रोत कोण आहेत? दिल्ली मद्य धोरणात काय घोटाळा आहे हे मला आत्तापर्यंत समजू शकले नाही. भाजपा दररोज वेगवेगळे आकडे आणि घोटाळ्यांची रक्कम घेते, तर सीबीआय एफआयआर फक्त १ कोटी रुपये सांगतो. त्यांनी (मनीष) सिसोदिया यांच्या घरावर आणि बँकेच्या लॉकरवर छापा टाकला आणि त्यांना काहीही मिळाले नाही. त्यांनी त्यांच्या (सिसोदियाच्या) लोकांकडेही विचारपूस केली पण काहीही सापडले नाही." असंही केजरीवाल म्हणाले.

राष्ट्रीय राजधानीत पत्रकार परिषदेला संबोधित करताना केजरीवाल म्हणाले की, "उपराज्यपाल, सीबीआय आणि भाजपाने कथित घोटाळ्यात गुंतलेल्या वेगवेगळ्या रकमेचा उल्लेख केला आहे, परंतु ते प्रत्यक्षात काय होते हे त्यांना समजले नाही. "त्यांच्या (भाजप) एका नेत्याने ८ हजार कोटी रुपयांचा घोटाळा असल्याचे म्हटले आहे, उपराज्यपालांचे म्हणणे आहे की हा १४४ कोटींचा घोटाळा आहे आणि सीबीआय एफआयआर सांगतो की १ कोटी रुपयांचा घोटाळा आहे. 'मद्य घोटाळा' नक्की काय आहे तेच समजत नाहीये." केजरीवाल म्हणाले की, "भाजपा सीबीआय आणि ईडीचा वापर करून देशभरात सर्वांना धमकावत आहे. "सीबीआयच्या छाप्यांवर बोलण्याऐवजी आणि विचार करण्याऐवजी त्यांनी आमच्यासारखं महत्त्वाच्या सार्वजनिक कामांवर लक्ष केंद्रित केलं पाहिजे."

आता रद्द करण्यात आलेल्या दिल्ली उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२ मध्ये कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून, अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) देशभरातील सुमारे ४० ठिकाणी नव्याने छापेमारी केली आहे. यानंतर काही तासांनी मुख्यमंत्री केजरीवाल यांचे हे विधान समोर आले आहे.

आम आदमी पार्टी विरोधातील "स्टिंग ऑपरेशन" वर भाजपाला प्रत्युत्तर देताना केजरीवाल म्हणाले, "यामध्ये मद्य घोटाळ्यातील एक आरोपी असे म्हणताना ऐकू येते की, उत्पादन शुल्क धोरण अशा प्रकारे तयार केले गेले आहे की काही निवडक लोकांना फायदा झाला. तर, "हे स्त्रोत कोण आहेत? दिल्ली मद्य धोरणात काय घोटाळा आहे हे मला आत्तापर्यंत समजू शकले नाही. भाजपा दररोज वेगवेगळे आकडे आणि घोटाळ्यांची रक्कम घेते, तर सीबीआय एफआयआर फक्त १ कोटी रुपये सांगतो. त्यांनी (मनीष) सिसोदिया यांच्या घरावर आणि बँकेच्या लॉकरवर छापा टाकला आणि त्यांना काहीही मिळाले नाही. त्यांनी त्यांच्या (सिसोदियाच्या) लोकांकडेही विचारपूस केली पण काहीही सापडले नाही." असंही केजरीवाल म्हणाले.

# भारताला 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवायचंय- पंतप्रधान नरेंद्र मोदी

## उझबेकिस्तानमधील समरकंद येथे शिखर परिषदेचे आयोजन

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

उझबेकिस्तानमधील समरकंद येथे सुरू असलेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) शिखर परिषदेत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांनी भारताला लवकरच 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवणार असल्याचे म्हटले आहे.

काय म्हणाले पंतप्रधान मोदी?



"जग कोविड-१९ चा सामना करत आहे. कोविड आणि युक्रेनच्या संकटामुळे जागतिक पातळीवर आयात-निर्यातीत अनेक अडचणी निर्माण झाल्यात आहेत. आम्हाला भारताला मॅन्युफॅक्चरिंग हब बनवायचे आहे. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आज भारतात ७० हजारांहून अधिक स्टार्ट-अप सुरू झाले आहेत. आम्ही विकासावर आमचे लक्ष केंद्रीत करत आहोत. मला आनंद आहे की, भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

दरम्यान, यावेळी पंतप्रधान मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि इतर नेत्यांमध्ये प्रादेशिक सुरक्षा आणि व्यापारवाढीवर चर्चा झाली. तत्पूर्वी उझबेकिस्तानचे पंतप्रधान अब्दुल्ला आरिफॉव्ह आणि समरकंदचे राज्यपाल यांनी पंतप्रधान मोदींचे समरकंदमध्ये स्वागत केले. समरकंदमध्ये होणाऱ्या शिखर परिषदेचे दोन सत्र होणार आहेत. पहिल्या सत्रात केवळ शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनचे सदस्य सहभागी होणार आहेत. तर दुसऱ्या सत्रामध्ये इतर देशांनाही निमंत्रित करण्यात येणार आहे.

# 'जॉन्सन बेबी पावडर'चा परवाना कायमचा रद्द

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



जॉन्सन अँड जॉन्सन प्रा.लि या बहुराष्ट्रीय कंपनीने उत्पादित केलेल्या 'जॉन्सन बेबी पावडर' या सौंदर्य प्रसाधनाचा उत्पादन परवाना कायमचा रद्द करण्याची कारवाई अन्न व औषध प्रशासनाने केली आहे. या प्रसाधनांचे नमुने प्रशासनाच्या नाशिक व पुणे येथील औषध निरीक्षकांनी गुणवत्ता चाचणीसाठी पाठवण्यात आले होते. त्यानंतर उत्पादन पद्धतीमध्ये दोष असल्याचे कारण देत हा परवाना रद्द करण्यात आला आहे. मुंबई शासकीय विश्लेषक आणि औषध नियंत्रण प्रयोगशाळा यांनी वरील दोन्ही नमुने राष्ट्रीय मानकांनुसार अयोग्य असल्याचा निष्कर्ष नोंदवून अप्रमाणित घोषित केले होते. यानुसार अनुज्ञप्ती रद्द का करण्यात येऊ नये, अथवा नमूद केलेल्या परवान्याअंतर्गत मंजूर असलेल्या सौंदर्य प्रसाधनाची उत्पादन अनुमती निलंबित किंवा रद्द का करू नये याबाबत कारणे दाखवा कारणे दाखवा नोटीस बजावण्यांत आली होती. तसेच कंपनीला उत्पादनाचा साठा बाजारातून परत बोलावण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. नमुन्याचे प्राप्त शासकीय विश्लेषकाचे अहवाल मान्य नाही म्हणून कंपनीने केंद्रीय औषध प्रयोगशाळेकडून फेरचाचणी होण्यासाठी नाशिक व पुणे न्यायालयात अर्ज केला होता. केंद्रीय औषध प्रयोगशाळेकडून ही फेरचाचणी करण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, कोलकत्ता येथील केंद्रीय औषध प्रयोगशाळेने या नमुन्यांची चाचणी अप्रमाणित घोषित केली.

# आठ वर्षांनी मृणाल कुलकर्णी पुन्हा एकदा दिग्दर्शिकेच्या भूमिकेत




'स्वामी' या ऐतिहासिक मालिकेतून मनोरंजन क्षेत्रात पदार्पण करत अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी आतापर्यंत विविध भूमिका सकारात प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. मराठी मनोरंजन सृष्टीत त्या सतत नावीन्यपूर्ण काम करत आल्या आहेत. अभिनयाबरोबरच लेखन आणि दिग्दर्शनातही त्यांनी आपले नशीब आजमावले आहे. आता पुन्हा एकदा त्या आपल्याला दिग्दर्शिकेच्या भूमिकेत दिसणार आहेत. हिंदीमध्ये अनेक सुपरहिट चित्रपटांचे लेखन आणि निर्मिती करणा-या परितोष पेंटर यांच्या कॅलिडोस्कोप सिनेमा अँड पिक्चर्स प्रॉडक्शन्स आणि राजेशकुमार मोहंती यांच्या एस. आर एन्टरप्रायजर्स या दोन मोठ्या निर्मितीसंस्थांनी नुकतीच एकत्रितपणे आपल्या आगामी सात नव्या चित्रपटाची घोषणा काल केली. यातील एका चित्रपटाचे दिग्दर्शन मृणाल कुलकर्णी करणार आहेत.

या चित्रपटाचे नाव 'फक्त महिलांसाठी' असे आहे. या चित्रपटात सई ताम्हणकर, शिवानी रंगोळे, प्रसाद ओक आणि वंदना गुप्ते हे कलाकार





महत्वपूर्ण भूमिका साकारणार आहेत. तर या चित्रपटाचे लेखन विराजस कुलकर्णी आणि ओंकार गोखले यांनी केले आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाले. या पोस्टरमध्ये ट्रेनचा दरवाजा दिसत आहे. पण या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख अजून जाहीर झालेली नाही.

# वर्षा उसगावकर आणि आशा भोसलेंच्या चाहत्यांसाठी खास पर्वणी

'द ग्रेट इंडियन किचन' या बहुचर्चित मल्याळम सिनेमातील अभिनेत्री निमिषा संजयन लवकरच मराठीत पदार्पण करणार आहे. या चित्रपटाचं नाव 'हवाहवाई'ची असून यामध्ये दिग्गज कलाकारांची मांदियाळी असणार आहे. निमिषासह वर्षा उसगावकर, सिद्धार्थ जाधव, समीर चौघुले अशा दमदार कलाकारांची फौज या चित्रपटात आहे. हा चित्रपट ७ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं पोस्टर मुंबईतील शिवाजी पार्क येथे फूड स्टॉल चालविणाऱ्या महिलांच्या हस्ते लाँच करण्यात आले. मराठी तारका प्रॉडक्शन्सचे महेश टिळेकर आणि नाईनटिन नाईन प्रॉडक्शन्सचे विजय शिंदे यांनी 'हवाहवाई' चित्रपटाची निर्मिती केली आहे. महेश टिळेकर यांनी चित्रपटाचं लेखन, दिग्दर्शन आणि संकलन केलं आहे. विशेष म्हणजे ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी वयाच्या ८८व्या वर्षी या चित्रपटातलं उडत्या चालीचं एक गाणं हवाहवाईमध्ये गायलं आहे. गायिका उर्मिला धनगर हिच्या ठसकेबाज आवाजातही एक उत्तम गीत रेकॉर्ड करण्यात आले आहे. चित्रपटाचे संगीत पंकज पडघन यांचे असून चित्रपटातील गीते महेश टिळेकर यांनी लिहिली आहेत.

मल्याळम चित्रपटांमध्ये निमिषा संजयननं सशक्त अभिनेत्री म्हणून ओळख मिळवली आहे. आता




हवाहवाई या चित्रपटाद्वारे ती मराठी चित्रपटांत पदार्पण करत आहे. तिच्यासह अभिनेत्री वर्षा उसगावकर महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. संजीवनी जाधव, किशोरी गोडबोले, समीर चौघुले, अतुल तोडणकर, सिद्धार्थ जाधव, गौरव मोरे, मोहन जोशी, स्मिता जयकर, गार्गी फुले, प्राजक्ता हनमघर, पूजा नायक, सीमा घोगळे, बिपिन सुर्वे, अंकित मोहन या कलाकारांनी विविध भूमिका हवाहवाई चित्रपटात साकारल्या आहेत.

# 'आरआरआर' चित्रपट ऑस्करच्या शर्यतीत पुढे




एस.एस.राजामौली हे भारतातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकांपैकी एक आहेत. 'बाहुबली' पाठोपाठ त्यांच्या 'आरआरआर' या चित्रपटाला जगभरातून तुफान प्रतिसाद मिळाला. हा चित्रपट ऑस्कर नामांकनांवरून गेले काही दिवस पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या चित्रपटाचे नाव ऑस्कर नामांकनांच्या यादीत वरच्या बाजूला असल्याचे म्हटले जात असून या चित्रपटाला दोन नामांकनं मिळण्याची दाट शक्यता असल्याचे वर्तवले गेले व्हरायटी' या आंतरराष्ट्रीय मासिकाने एस. एस. राजामौली यांच्या 'आरआरआर' या चित्रपटाला ऑस्कर २०२३ मध्ये एक नव्हे, तर दोन विभागांमध्ये नामांकन मिळेल असा अंदाज वर्तवला आहे. ही बातमी चित्रपटाच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय मासिक 'व्हरायटी'नुसार, 'आरआरआर' चित्रपटाला 'बेस्ट ओरिजिनल सॉंग' या विभागात 'दोस्ती' या गाण्यासाठी पहिले नामांकन मिळेल, तर 'बेस्ट इंटरनॅशनल फिचर फिल्म' या विभागात 'आरआरआर'ला दुसरे नामांकन मिळू शकते. आहे. आरआरआर'ला जर 'बेस्ट इंटरनॅशनल फिचर फिल्म' या विभागात नामांकन मिळाले तर 'अर्जेंटिना १९८५', 'बार्डो', 'क्लोज' आणि 'होली स्पायडर' हे चित्रपट त्याचे प्रतिस्पर्धी चित्रपट असतील असेही 'व्हरायटी' या अंतरराष्ट्रीय मासिकाने म्हटले. पण अकादमी पुरस्कारांकडून "ऑस्कर २०२३' च्या नामांकनांची यादी अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. ती यादी येत्या काही दिवसांत जाहीर होऊ शकते असे बोलले जात आहे. एस. एस. राजामौली दिग्दर्शित 'आरआरआर' या चित्रपटाने जगभरातून १००० कोटींहून अधिक रकमेची कमाई केली. या चित्रपटात अनेक दिग्गज कलाकार होते. दक्षिणात्य सुपरस्टार रामचरण आणि ज्युनियर एनटीआर यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका साकारल्या. त्यासोबतच या चित्रपटात बॉलीवूड स्टार अजय देवगण आणि आलिया भट्ट देखील महत्वपूर्ण भूमिकेत दिसले. या चित्रपटाच्या माध्यमातून आलिया भट्ट आणि अजय देवगणने दक्षिण चित्रपटसृष्टीत पदार्पण केले.

# नागा चैतन्य-समांथाच्या घटस्फोटावर नागार्जुन यांनी दिली प्रतिक्रिया

दाक्षिणात्य सुपरस्टार नागार्जुन 'ब्रह्मास्त्र' चित्रपटामुळे सध्या चर्चेत आहेत. या चित्रपटात त्यांनी अनीश शेट्टी उर्फ नंदी अस्त्र ही भूमिका साकारली आहे. चित्रपटाच्या यशानंतर नुकतंच त्यांनी प्रसारमाध्यमांना मुलाखत दिली. यावेळी त्यांनी नागा चैतन्य आणि समांथाच्या घटस्फोटावर प्रतिक्रिया दिली आहे.

नागार्जुन यांना त्यांचा मुलगा अभिनेता नागा चैतन्य आणि अभिनेत्री समांथाच्या घटस्फोटाबद्दल विचारण्यात आले. यावर 'पिंकवाला'ला उत्तर देत ते म्हणाले, "घटस्फोटानंतर माझा मुलगा खूश आहे, हे मला दिसत आहे. त्याच्याबरोबर घडलेला हा एक वाईट अनुभव होता. आता सगळं संपलं आहे. आपण आता याबद्दल चर्चा करणं योग्य नाही. आमच्या जीवनातून ही गोष्ट निघून गेली आहे. सगळ्यांच्याच आयुष्यातून ही गोष्ट निघून जाईल, अशी अपेक्षा आहे". नागा चैतन्य आणि समांथा



ऑक्टोबर २०२१मध्ये घटस्फोट घेत एकमेकांपासून वेगळे झाले. घटस्फोटानंतर नागा चैतन्यने दोघांमधील नात्याबद्दल एका मुलाखतीदरम्यान सांगितलं होतं. " आम्ही दोघेही एकमेकांचा खूप आदर करतो. तिच्याबद्दल माझ्या मनात कायम आदर राहील. त्याच गोष्टीवर बोलून मला कंटाळा आला आहे", असं तो म्हणाला होता.

नागार्जुन यांनी आता नागा चैतन्य-समांथाच्या घटस्फोटावर प्रतिक्रिया दिल्यामुळे ते चर्चेत आले आहेत. त्यांची महत्त्वाची भूमिका असलेला 'ब्रह्मास्त्र' चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. ट्रेलरपासूनच बॉयकॉट ट्रेण्डमध्ये अडकूनही चित्रपटाची जादू बॉक्स ऑफिसवर कायम असल्याचं पाहायला मिळत आहे. या चित्रपटात अभिनेत्री आलिया भट्ट आणि अभिनेता रणबीर कपूर मुख्य भूमिकेत आहेत. तर बिग बी अमिताभ बच्चन, मौनी रॉय यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.

# आशिया चषकात विराटची जोरदार कामगिरी

## टी-20 क्रमवारीत 14 व्या स्थानी झेप

।डर्बी । महाईन्यूज ।




नुकत्याच पार पडलेल्या आशिया चषकात कोहलीने 'विराट' कामगिरीच्या जोरावर १४ स्थानांची उंच उडी घेत सर्वोतम २० मध्ये पोहचला. अफगानिस्तान विरुद्ध त्याने टी २० मधील पहिले शतक झळकवत आपण फॉर्म मध्ये आलो आहोत हे दाखवून दिले. तो या हंगामातील सर्वाधिक धावा करणारा दुसरा फलंदाज राहिला. विराटने आशिया चषक २०२२ मध्ये सुंदर खेळींचे प्रदर्शन केले. त्यामध्ये त्याने २ अर्धशतके आणि एका शतकाच्या जोरावर संपूर्ण मालिकेत २७६ धावा फटकावल्या आहेत. एकूण ५ सामन्यांमध्ये त्याने या धावा केल्या आहेत. यादरम्यान अफगाणिस्तानविरुद्ध त्याच्या बॅटने खोऱ्याने धावा केल्या होत्या. या सामन्यात त्याने नाबाद १२२ धावा चोपल्या होत्या, जी त्याची कारकिर्दीतील सर्वोच्च वैयक्तिक खेळी ठरली.

विराट आयसीसी फलंदाजांच्या टी २० क्रमवारीत १५ व्या स्थानावर पोहोचला आहे. आशिया चषकापूर्वी तो ३३ व्या स्थानावर होता. आता विराटच्या खात्यात ५९९ गुण जमा झाले आहेत. तो भारताचा विद्यमान कर्णधार रोहित शर्मापासून फक्त एका स्थानाने आणि ७ गुणांनी मागे आहे. रोहित ६०६ गुणांसह चौदाव्या क्रमांकावर आहे. तर पाकिस्तानचा यष्टीरक्षक फलंदाज मोहम्मद रिझवान अव्वलस्थानी कायम आहे. तो आशिया चषकातील सर्वाधिक धावा करणारा फलंदाजही राहिला होता. त्याने ६ सामन्यात २८१ धावा केल्या होत्या. या प्रदर्शनानंतर त्याचे आयसीसी फलंदाजी क्रमवारीतील गुण ८१० झाले आहेत. रिझवाननंतर ऍडेन मार्करम ७९२ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.यासह विराट क्रिकेटच्या तिन्ही स्वरूपात आयसीसी फलंदाजी क्रमवारीत टॉप-१५ मध्ये असणारा फलंदाज बनला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### पॅरिस-सेंट जर्मेनच्या विजयात तारांकित खेळाडूंची चमक

जिनेव्हा । महाईन्यूज

लिओनेल मेसी, किलियन एम्बापे आणि नेमार या तारांकित खेळाडूंनी झळकावलेल्या गोलच्या जोरावर पॅरिस-सेंट जर्मेन संघाने चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेत मकाबी हैफा संघावर ३-१ असा विजय नोंदवला. सामन्याच्या २४व्या मिनिटालाच मकाबीकडून त्जॅरोन चेरीने गोल मारत संघाला आघाडी मिळवून दिली. यानंतर मेसीने (३७व्या मि.) गोल झळकावत पॅरिस-सेंट जर्मेनला आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत बरोबरी ही कायम होती. दुसऱ्या सत्रात पॅरिस-सेंट जर्मेनने आक्रमक खेळ करत मकाबीवर दबाव निर्माण केला. ६९व्या मिनिटाला मेसीच्या साहाय्याने एम्बापेने गोल करत संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर अनुभवी नेमारने (८८व्या मि.) गोल झळकावत संघाला ३-१ अशा सुस्थितीत पोहोचवले. दुसऱ्या सत्रात उत्तरार्धात केलेल्या गोलमुळे रेयाल माद्रिदने लेइपझिगवर २-० अशी मात केली. सामन्यातील पहिल्या सत्रात दोन्ही संघांकडून गोल करण्याचे प्रयत्न झाले, मात्र कोणाला गोल करता आला नाही. दुसऱ्या सत्रात माद्रिदच्या फेडेरिको व्हाल्वेर्डे (८०व्या मिनिटाला) गोल झळकावत संघाला आघाडी मिळवून दिली.

# रॉजर फेडररचा ग्रँड सलाम..!



।मुंबई । महाईन्यूज ।

आपल्या नजाकतदार खेळाने, लोभस व्यक्तिमत्त्वाने, असीम ऊर्जा आणि थक्क करणाऱ्या तंदुरुस्तीने गेली दोन दशके जगभरातील टेनिस रसिकांवर गारुड केलेल्या रॉजर फेडररने स्पर्धात्मक टेनिसमधून निवृत्त होण्याची घोषणा गुरुवारी सायंकाळी केली.

टेनिस आणि टेनिस रसिकांविषयी कृतार्थभाव व्यक्त करणारे त्याचे ध्वनिमुद्रित ट्वीट फेडररच्या सुसंस्कृतपणाची प्रचीती आणून देणारे होते खरे, परंतु ४१व्या वर्षीही तो कदाचित टेनिस कोर्टवर दमदार पुनरागमन करेल, अशी आशा बाळगलेल्या असंख्यांसाठी त्याची घोषणा निश्चितच खंतावणारी ठरली. याचे कारण रॉजर फेडररची लोकप्रियता केवळ खंडीभर ग्रँड स्लॅम जेतेपदांमुळे निर्माण झालेली नाही. खरे तर त्या २० जेतेपदांच्या जोरावरच फेडररची महान टेनिसपटूंमध्ये गणना झालेली आहे. पण तो केवळ महान नव्हे, तर 'लाडका' ठरतो त्याच्या स्नेहस्निग्ध स्वभावामुळे आणि टेनिस कोर्टवरील त्याच्या किमयागारीमुळे. टेनिस हा ताकदीचा खेळ, पण फेडरर ऐन भरात खेळायचा त्यावेळी कोणी टेनिस कोर्टवर काव्य रचतोय किंवा कुंचल्याचे फटकारे देत एखादे सुंदर चित्र निर्मितोय, असा भास व्हायचा. निराशा आणि अपयशाच्या क्षणांमध्येही त्याने स्वत:विषयी, प्रतिस्पर्ध्याविषयी किंवा प्रेक्षकांविषयी कटुताभाव चेहऱ्यावर आणले नाहीत. विजयानंदात किंवा क्वचित प्रसंगी पराभवानंतर त्याचा अनेकदा अश्रुपात व्हायचा आणि हा फेडरर लाखोंना आपल्यातला वाटून जायचा. या प्रेमाचे कारण फेडररने या सर्वांना त्याच्या जिंकण्याची सवय लावली होती.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही